0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक ०९/०१/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०१/२०१३/जा.३८, दिनांक १४/०१/२०१३, ३०/०१/२०१३, ०७/०२/२०१३ व २५/०२/२०१३.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, डोंगरी पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २९/०१/२०१३ रोजीचे अभिवेदन.

४) मे. मधू गॅस सर्व्हिस एजन्सीचे मालक सलिम दोसानी यांच्या वतीने ॲड. श्री. अश्विन हवेलीकर यांचे दिनांक ०६/०२/२०१३ रोजीचा विनंती अर्ज.

५) टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० चा मालक मानसिंग श्रीरंग भानसे याचे दिनांक ०६/०२/२०१३ रोजीचे निवेदन.

६) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, डोंगरी पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक ०६/०२/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

७) मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. चे विभागीय विक्री अधिकारी यांचे दि. २५/०२/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवाल.

८) मे. मधू गॅस सर्व्हिस एजन्सीचे मालक सलिम दोसानी यांचे दिनांक १२/०३/२०१३ रोजीचे निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०१/२०१३/जा.८८२
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक १७ / ०४/२०१३.

### आ दे श

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ०४/०१/२०१३ रोजी वाडीबंदर येथील अमर ॲटो पेट्रोल पंपाजवळ टेम्पोमध्ये एका गॅस सिलेंडरमधून दुसऱ्या गॅस सिलेंडरमध्ये गॅस भरत असल्याबाबत या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी हे पंचांसह दुपारी ३:०० वाजताच्या सुमारास शासकीय वाहनाने अमर पेट्रोल पंपाच्या समोरील रोडच्या समोरील बाजूस उभा असलेल्या लाल रंगाचा

टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० जवळ आले. तेव्हा सदर टेम्पोच्या मागील बाजूस असलेला दरवाजा बंद आढळला. सदर दरवाजा पथकातील अधिकाऱ्यांनी ठोठवला असता, आतील व्यक्तीने टेम्पोचा दरवाजा उघडला असता, टेम्पोच्या आतमध्ये एक इसम आढळला. पथकातील अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष त्याचे नांव विचारले असता, त्याने त्यांचे नांव कैलास बाळकृष्ण खराडे असे सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी त्यांची व पंचाची ओळख सदर इसमास करुन दिली. त्यावेळी त्याचे हातात १० इंच लांबीची एक लोखंडी नळी (बासरी) आढळून आली. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष तु काय करीत आहेस, असे विचारले असता, त्याने असे सांगितले की, तो टेम्पोचे शटर बंद करुन भरलेल्या व्यवसायिक गॅस सिलेंडरमधील गॅस दुसऱ्या रिकाम्या व्यवसायिक गॅस सिलेंडरमध्ये १० इंच लांबीच्या लोखंडी नळी उर्फ बासरी मार्फत गॅस भरत होतो. असे अर्धवट भरलेले व्यवसायिक गॅस सिलेंडर तो हॉटेलवाले, फेरीवाले यांना रुपये १,६६२/- या दराने विकतो. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष अधिक सखोल चौकशी केली असता त्याने असे सांगितले की, सदरचे गॅस मधू गॅस सर्व्हिसचा डिलिव्हरी बॉय व त्यांचा ४०७ मॉडेल टेम्पोचा ड्रायव्हर ओमप्रकाश असे दोघे मिळून त्याला सदर कामात मदत करतात.

अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदर टेम्पोची झाडझडती घेतली असता, सदर टेम्पोमध्ये पुर्णपणे भरलेले असे १४ व्यवसायिक गॅस सिलेंडर, २ रिकामे व्यवसायिक गॅस सिलेंडर व १ अर्धवट भलेला व्यवसायिक गॅस सिलेंडर असे मिळून एकूण १७ व्यवसायिक गॅस सिलेंडर आढळले. तसेच सदर वर नमूद टेम्पोमध्ये एका सिलेंडरमधून दुसऱ्या सिलेंडरमध्ये गॅस भरताना वास येवू नये म्हणून वापरला जाणारा स्प्रिंग गार्डन लेमन एअर फ्रेशनरचा एक डबा आढळला. तसेच भारत पेट्रोलियम कंपनीचे लोगो असलेले पिंवळे १५ सिल व गॅस सिलेंडरच्या नॉबला लावायाची सफेद रंगाची प्लॅस्टिकची एकूण ६६ बुचे झडतीमध्ये आढळली, एक वेराईटमॉडेल नंबर ११ असलेला १०० किलोचा वजन काटा, सुमारे १० इंचाची लोखंडी नळी (बासरी) आढळून आली. त्याच्या अंगझतीमध्ये मधू गॅस सर्व्हिस यांचे नांवे असलेले कॅश मेमो क्र. ३२९५ दिनांक ०३/०१/२०१३ वर ग्राहकाचे नांव कैलाश, पत्ता निरंक नमूद असून त्यावर निरंक किलोग्रॅम भारत एलपीजी गॅस फुल सिलेंडर इच रुपीज १३ x रुपये २१६०६/- असे कॅशमेमोवर डिसकाऊंट रुपये १००/- वजा करुन रुपये २१,५०६/- असे नमूद असून त्या छापील कॅश मेमोवर स्वाक्षरी नसलेले असे कॅश मेमो आढळले. तसेच दुसरा कॅश मेमो क्र. ३२९६ दिनांक ०४/०१/२०१३ वर अशी दोन बिले अंगझडतीत सापडली. कॅश मेमो क्र. ३२९६ वर दिनांक ०४/०१/२०१३ वर ग्राहकाचे नांव कैलाश पत्ता निरंक नमूद असून त्यावर १९ किलोग्रॅम भारत एलपीजी गॅस फुल सिलेंडर इच रुपीज १,६६२/- प्रमाणे ५ गॅस सिलेंडर्सची किंमत रुपये ८,३१०/- असे कॅश मेमोवर नमूद असून त्या छापील कॅश मेमोवर मधू गॅस सर्व्हिसच्या मेमोवर तेथे काम करीत असलेल्या कर्मचाऱ्याची स्वाक्षरी आहे.

CONTROLLER OF RATIO

दरम्यानच्या कालावधीत पथकातील अधिकाऱ्यांनी भ्रमणध्वनीवरुन पोलिस सहाय्यता क्रमांक १०० वर पोलिस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून सदर घटनेबाबत पोलिसांना माहिती देऊन घटनास्थळी पोलिसांना पाठविण्याबाबत कळविले.

टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० चे ड्रायव्हर कैलास बाळकृष्ण खराडे यांनी त्यांचे जबाबामध्ये सदर कामात मधू गॅस सर्व्हिसचे मालकाचे ४०७ मॉडेलच्या टेम्पोचा ड्रायव्हर रामनिवास बिष्णोई तसेच डिलिव्हरी बॉय ओमप्रकाश बिष्णोई असे दोघे मिळून त्याला मदत करतात असे सांगितले. तसा त्याचा लेखी जबाब अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष नोंदविला आहे.

तसेच मधू गॅस सर्व्हिसची दोन बिले सापडल्याने, मधू गॅस सर्व्हिसची तपासणी करण्याकरिता पथकातील पाच शिधावाटप निरिक्षक सायंकाळी ०६:०० वाजता रवाना झाले.

मे. मधू गॅस सर्व्हिस एजन्सीची संपूर्ण तपासणी घेण्यात आली. सदर दोन्ही बिले त्यांचेकडून दिल्याचे तपासणीत निष्पन्न झाले. त्याबाबत मे. मधू गॅस सर्व्हिस एजन्सीचे मालक सलिम दोसानी यांचा लेखी जबाब घेण्यात आला. सदर धाडीत जप्त केलेल्या मुद्देमालाचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची अंदाजे किंमत(रुपये) |
|---|---|---|---|
| १ | व्यवसायिक वापराचे १९ कि.ग्रॅ. च्या भरलेल्या गॅस सिलेंडर्समधील गॅसची किंमत | १४ | २३,२६८/- |
| २ | उक्त व्यवसायिक वापराचे १९ कि.ग्रॅ. चे रिकामी गॅस सिलेंडर्सची किंमत | १४ | ४२,०००/- |
| ३ | उक्त व्यवसायिक वापराचे १९ कि.ग्रॅ. चे रिकामी गॅस सिलेंडर्सची किंमत | २ | ६,०००/- |
| ४ | अर्धवट भरलेला व्यवसायिक वापराचे १९ कि.ग्रॅ. च्या गॅस सिलेंडर्समधील गॅसची किंमत | १ | ८३२/- |
| ५ | उक्त व्यवसायिक वापराचा १९ कि.ग्रॅ. च्या रिकामी गॅस सिलेंडर्सची किंमत | १ | ३,०००/- |
| ६ | महिंन्द्रा जीआयओ मेकचा लाल रंगाचा टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० | १ | २,००,०००/- |
| ७ | वजन काटा | १ | ३००/- |
| ८ | सुमारे १० इंचाची लोखंडी नळी (बासरी) | १ | १००/- |
| ९ | गॅस सिलेंडर्सच्या नॉबला लावायची प्लॅस्टिकची सफेद रंगाची बुचे | ६६ | ३३०/- |
| १० | भारत पेट्रोलियम असे लोगो असलेले पिवळ्या रंगाचे सिल | १५ | ७५/- |
| ११ | स्प्रिंग गार्डन लेमन एअर फ्रेशनर | १ | १५०/- |
| | | एकूण | २,७६,०५५/- |

व्यवसायिक गॅस सिलेंडर्सने भरलेला टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० व त्यातील १९ कि.ग्रॅ. वजनाचे एकूण १७ गॅस सिलेंडर्स घटनास्थळी जप्त करण्यात आले. सदर जप्त मुद्देमाल व टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० चे ड्रायव्हर कैलास बाळकृष्ण खराडे यांस घटनास्थळी उपस्थित झालेले श्री. बी.एस. जगताप, ए.एस.आय., डोंगरी पोलिस ठाणे यांचे ताब्यात दिले.

अशाप्रकारे घटनास्थळी कैलास बाळकृष्ण खराडे, मे. मधू गॅस सर्विस यांच्या ४०७ मॉडेल टेम्पोचा ड्रायव्हर रामनिवास बिष्णोई व डिलिव्हरी बॉय ओमप्रकाश बिष्णोई यांनी संगनमताने व्यवसायिक गॅस सिलेंडरमध्ये घरगुती गॅस सिलेंडरमधील गॅस भरुन ते टेम्पोमध्ये भरुन त्या गॅस सिलेंडर्समधील गॅस १० इंच लांबीच्या लोखंडी नळी (बासरी)चे सहाय्याने व्यवसायिक वापराच्या रिकामी गॅस सिलेंडरमध्ये अर्धवट भरुन त्याला त्यांच्याकडे झाडझडतीत मिळालेले भारत पेट्रोलियम कंपनीचे लोगो मार्क असलेले पिवळ्या रंगाचे प्लॅस्टिकचे सिल लावून ते अवैधमार्गाने हॉटेल व्यवसायिकांना तसेच फेरीवाल्यांना विक्री करीत असल्याचे आढळून आले. गॅस सिलेंडर्सचा काळाबाजार करुन शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक करीत असल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांनी, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ व ८ तसेच दि लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (रेग्युलेशन ऑफ सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्यूशन) ऑर्डर २००० चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द डोंगरी पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.नों.क्र. ०१/२०१३ दिनांक ०५/०१/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २९/०१/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक २९/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उपनिरिक्षक श्री. डी.एच. खरात यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० चा मालक मानसिंग श्रीरंग मानसे, टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० चा चालक कैलास बाळकृष्ण खराडे, मे. मधू गॅस सर्व्हिसच्या मालकीचे ४०७ मॉडेलच्या टेम्पोचा ड्रायव्हर रामनिवास बिष्णोई व मे. मधू गॅस सर्व्हिसमधील डिलिव्हरी बॉय ओमप्रकाश बिष्णोई यांनी उपस्थित राहून त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. तसेच सदर सुनावणीस मे. मधू गॅस सर्व्हिस एजन्सीचे मालक सलिम दोसानी हे उपस्थित राहिले नाहीत.

सुनावणीच्या वेळी कैलास बाळकृष्ण खराडे यांनी व्यवसायीक वापराचे सिलेंडर्स मे. मधु गॅस एजन्सीकडून घेतल्याचे सांगून त्यामधील गॅसचा साठा अनधिकृतरित्या काढून दुसऱ्या सिलेंडर्समध्ये भरत असल्याचे कबूल केले. तसेच त्याने सिलेंडर्सकरीता संबंधित गॅस एजन्सीकडे गॅस ग्राहक म्हणून नोंदणी केली नसल्याचे सांगितले आहे. सदरची बाब विभागीय विक्री अधिकारी यांच्याकडून अधिक स्पष्ट होणे गरजेचे असून संबंधित गॅस एजन्सीने नोंदणीकृत नसलेल्या व्यक्तीस गॅस सिलेंडर्सचा पुरवठा कसा केला, यांबाबत खातरजमा करण्यासाठी तेल कंपनीचे विभागीय विक्री अधिकारी यांना तसेच संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठीं पुढील सुनावणी दिनांक ०६/०२/२०१३ रोजी ठेवण्यांत आली.

दिनांक ०६/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. डी.एच. खरात यांनी उपस्थित राहून टपालामार्फत अभिवेदन सादर केले असल्याचे सांगितले. मे. मधू गॅस सर्व्हिस एजन्सीचे मालक सलिम दोसानी यांच्या वतीने अॅड. अश्विन हवेलीकर हे वकालतनाम्यासह उपस्थित राहिले व आपले म्हणणे सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास वाचावे क्र. ४ अन्वये विनंती अर्ज सादर केला. टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० चा मालक मानसिंग श्रीरंग भानसे यांनी सुनावणीस उपस्थित राहून वाचावे क्र. ५ अन्वये निवेदन सादर केले. टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० चा चालक कैलास बाळकृष्ण खराडे, मे. मधू गॅस सर्व्हिसच्या मालकीचे ४०७ मॉडेलच्या टेम्पोचा ड्रायव्हर रामनिवास बिष्णोई व मे. मधू गॅस सर्व्हिसमधील डिलिव्हरी बॉय ओमप्रकाश बिष्णोई हे सुनावणीस उपस्थित राहिले. परंतू त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगून लेखी निवेदन सादर केले नाही. सदर सुनावणीस मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. चे विभागीय विक्री अधिकारी ज्योती स्वरुप पटनाईक या उपस्थित राहिल्या. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक २०/०२/२०१३ रोजी ठेवण्यात आली. तथापी, दिनांक २०/०२/२०१३ रोजीची सुनावणी प्रशासकिय कारणास्तव रद्द करण्यांत आली. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक १२/०३/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. मधू गॅस सर्व्हिस एजन्सीचे मालक सलिम दोसानी यांच्या वतीने अॅड. अश्विन हवेलीकर यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ८ अन्वये लेखी निवेदन सादर केले.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

## <u>युक्तिवाद</u> :-

दिनांक २९/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उपनिरिक्षक श्री. डी.एच. खरात यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांच्या सादर केलेल्या अभिवेदनात तसेच दिनांक ०६/०२/२०१३ रोजी टपालामार्फत यांच्या अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील आरोपी क्र. १) कैलास बाळकृष्ण खराडे यास दिनांक

०५/०१/२०१३ रोजी अटक करण्यात आली आहे. यातील आरोपी टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० चा चालक कैलास बाळकृष्ण खराडे यांनी त्यांचे जबाबामध्ये सदर कामात मधू गॅस सर्व्हिसचे मालकाचे ४०७ मॉडेलच्या टेम्पोचा ड्रायव्हर रामनिवास बिष्णोई तसेच डिलिव्हरी बॉय ओमप्रकाश बिष्णोई असे दोघे मिळून त्याला मदत करतात असे सांगितले वरुन यातील आरोपी क्र. २) रामनिवास हेतराम बिष्णोई यास नमूद गुन्ह्यात दि.०७/०१/२०१३ रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच सदर गुन्ह्यातील आरोपी क्र. ३) ओप्रकाश सोहनलाल बिष्णोई, गॅस सिलेंडर डिलीव्हरी बॉय यास दि.२४/०१/२०१३ रोजी अटक करण्यात आली आहे. यातील अटक आरोपी क्र. १) कैलास बाळकृष्ण खराडे आणि अटक आरोपी क्र. २) रामनिवास हेतराम बिष्णोई यांना मा. न्यायालयाने दिनांक ०९/०१/२०१३ रोजी २०,०००/- रुपये कॅश जामीनावर सोडले आहे. तसेच यातील अटक आरोपी क्र. ३) ओप्रकाश सोहनलाल बिष्णोइ यास मा. अति. मुख्य महानगर दंडाधिकारी, दुसरे न्यायालय, माझगांव, मुंबई यांनी दिनांक २४/०१/२०१३ रोजी २०,०००/- रुपये कॅश जामीनावर सोडले आहे. सदर गुन्ह्यातील अटक आरोपी क्र. १) कैलास बाळकृष्ण खराडे ह्या आरोपीच्या कब्जातून नमूद प्रमाणे मालमत्ता हस्तगत करण्यात आला आहे. सदर हस्तगत करण्यात आलेली मालमत्ता हा गुन्ह्यातील महत्त्वाचा वस्तुजन्य पुरावा आहे. त्यामुळे वर नमुद हस्तगत मालमत्ता मा. अति. मुख्य महानगर दंडाधिकारी सो, दुसरे न्यायालय, माझगांव, मुंबई यांचे आदेशाशिवाय अटक आरोपीतास देण्यास त्यांची हरकत आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक ०६/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० चा मालक मानसिंग श्रीरंग भानसे यांनी युक्तीवाद केला की, त्याच्या नावे असलेली गाडी क्र. एमएच-०२-वायए-७५१० दिनांक १९/०५/२०१२ रोजी श्री. कैलास बाकु खराडे या व्यक्तीस विकली आहे. तसेच दिनांक ०४/०१/२०१३ रोजी काही गैर वर्तन केले असे त्याला दिनांक २८/०१/२०१३ रोजी नोटीस मार्फत कळविले असता त्याने पोलिस स्टेशन दिनांक २९/०१/२०१३ रोजी जबानी दिली आहे. तरी सदरचे पत्र अर्जासोबत जोडत आहे. तसेच श्री. कैलास बाकु खराडे याने दिनांक ०४/०१/२०१३ रोजी गुन्हा केला हे त्याला कुठल्या प्रकारे कळविले नाही. तसेच त्याने गाडी विकत्या वेळी करारपत्र लिहिले आहे की, करार पत्र दिनांक १८/०५/२०१२ रोजी घेतले आहे. तसेच दिनांक १९/०५/२०१२ रोजी गाडीचा तो मालक नाही व गाडीवर असलेली कोणतीही केस अथवा गुन्हा व कोणतेही तक्रार याला श्री. कैलास बाळु खराडे जबाबदार असतील असे त्याने मान्य केले आहे. तसेच तो करारपत्र सोबत देत असून त्याचा या गाडीशी काही संबंध नसून त्याला यातून मुक्त करावे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. चे विभागीय विक्री अधिकारी यांचे दिनांक २५/०२/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवालात, मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. ही कंपनी घरगुती आणि व्यवसायीक सिलेंडर वितरकास पुरवठा करते. सामान्य परिस्थितीत नियमानुसार व्यवसायीक सिलेंडर्सचे वितरण वितरकामार्फत प्राधिकृत ग्राहकास करण्यात येते, असे नमूद आहे.

CONTROLLER OF RATIONING ... HEAD

दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. मधू गॅस सर्व्हिस एजन्सीचे मालक सलिम दोसानी यांच्या वतीने उपस्थित ॲड. अश्विन हवेलीकर यांनी सादर केलेल्या निवेदनात, तो सलिम दोसानी असून त्याचे मे. मधु गॅस सर्व्हिस, शॉप नं. ४, मरीन हॉऊस, एस.व्ही.पी. रोड, डोंगरी, एम-९, मुंबई येथे ऑफिस आहे. त्याला मिळालेल्या कारणे दाखवा नोटीसमधील त्याचेविरुध्द केलेले वादविषयक अभिकथन तो नाकारत आहे. त्याचा उपरोक्त पत्त्यावर मे. मधु गॅस सर्व्हिस या नावे मागील ४६ वर्षापासून लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (एल.पी.जी.) सिलेंडर ग्राहकांना वितरीत करावयाचा व्यवसाय आहे. मे. मधु गॅस सर्व्हिस ही नोंदणीकृत विक्रेता असून भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांनी त्यांना सिलेंडर, वॉल, रेग्युलेटर इत्यादी वस्तू पुरवठा करण्यास प्राधिकृत केले आहे. मधु गॅस सर्व्हिस ही स्वच्छ कंपनी असून दिनांक ०४/०१/२०१३ रोजी ज्या गैरकृत्याच्या गतिविधी घडल्या त्यात त्यांचा काहीही संबंध नाही. त्यांच्याकडून घरगुती तसेच व्यवसायीक वापराचे हजारो सिलेंडरचे वितरण डोंगरी व इब्राहिम रहमतुल्ला रोड या विभागात केले जात आहे. सदर प्रकरणी त्यांना चुकीच्या पध्दतीने गोवले गेले असून दिनांक ०४/०१/२०१३ रोजी कैलास खराडे नामे इसम याने त्यांच्या मधु गॅस सर्व्हिस येथे संपर्क साधून पाच १९ किलो ग्रॅमचे सिलेंडर खरेदी केले. सोबत त्याने पाच रिकामे सिलेंडर आणले होते. सदर इसम त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून त्यास तात्काळ सिलेंडरची आवश्यक असल्याचे सांगितले असता, त्यांनी त्याला नोंदणीकृत ग्राहक म्हणून नोंदणी असल्याशिवाय ते सिलेंडरचा पुरवठा करु शकत नसल्याचे सांगितले. त्यामुळे त्यास सिलेंडर देण्यास नकार दिला. दिनांक ०३/०१/२०१३ रोजी त्याने १९ किलोचे १३ सिलेंडर त्यांच्याकडून खरेदी करते वेळी त्याने आवश्यक अनामत रक्कम भरुन नोंदणकृत ग्राहक होण्याचे आश्वासीत केले होते. तद्नंतर ५ सिलेंडर करीता त्याने विनंती करुन पुन्हा कथन केले की, तो अनामत रक्कम भरुन नोंदणीकृत ग्राहक होण्यास तयार असून सद्यस्थितीत त्याचेकडे तेवढी रक्कम उपलब्ध नसल्याचे सांगितले. त्याअनुषंगाने दिनांक ०४/०१/२०१३ रोजी त्यास ५ रिकामे सिलेंडर घेऊन ५ भरलेले सिलेंडर देण्यात आले. सदर इसम हा नोंदणीकृत ग्राहक नसला तरी त्याने रिकामे सिलेंडर आणून दिल्यामुळे त्यास त्यापोटी भरलेले सिलेंडर देण्यात आले. दिनांक ०४/०१/२०१३ रोजी डोंगरी पोलिस ठाणे येथून त्यांना अवगत करण्यात आले की, सदर इसमाने त्यांच्याकडून घेतलेले सिलेंडर हे टेम्पोमध्ये ठेऊन त्यामधून अर्धा गॅसचा साठा हा दुसऱ्या सिलेंडरमध्ये टाकत असताना तसेच सदरचे अर्धे भरलेले सिलेंडर तो स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी ग्राहकांना विकून फसवणूक करीत असल्याने त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. सदर इसम करीत असलेले गैरकृत्याबाबत त्यांना कोणतीही माहिती नाही. सदर इसमाने आरोप केले की, त्यांच्या गॅस एजन्सीमधून तात्पुरता चालक रामनिवास विष्णोई व डिलेव्हरी बॉय ओमप्रकाश बिष्णोई यांनी त्यास सदर गैरकृत्यासाठी मदत केली आहे. सदर प्रकरणी, जप्त टेम्पो हा मधू गॅस सर्व्हिस यांचेशी संबंधित नाही. मधु गॅस सर्व्हिस यांनी आजपर्यंत कोणत्याही गैरकृत्यामध्ये भाग घेतला नसून त्यांचा या प्रकरणी कोणताही दुर्भाव उद्देश नाही. केवळ सिलेंडरचे विक्री वाढविण्याच्या उद्देशाने पुरवठा केल्याचे नमूद केले. कैलास खराडे हे नोंदणीकृत ग्राहक असल्याचे समजून त्यांनी

0008

त्यास सिलेंडरचा पुरवठा केला असून सदरचे गैरकृत्याबाबत त्यांना कोणतीही कल्पना नसून जप्त मुद्देमालाबाबत त्यांचा काहीही संबंध नाही. यापुढील कालावधीत सिलेंडरचा पुरवठा करताना ते अधिक दक्ष राहून तसेच आवश्यक काळजी घेऊन पुरवठा करणार आहे. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता मधु गॅस सर्व्हिस यांचा कोणत्याही गैरकृत्यामध्ये सहभाग नाही अथवा त्यांनी कोणत्याही नियामाचा भंग केला नाही. त्यामुळे त्यांच्यावर लावण्यात आलेले आरोप परत करण्याची विनंती केली आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ०४/०१/२०१३ रोजी वाडीबंदर येथील अमर ॲटो पेट्रोल पंपाजवळ टेम्पोमध्ये एका गॅस सिलेंडरमधून दुसऱ्या गॅस सिलेंडरमध्ये गॅस भरत असल्याबाबत या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी उक्त ठिकाणी धाड टाकली असता, उक्त ठिकाणी कैलास बाळकृष्ण खराडे, मे. मधू गॅस सर्विस यांच्या ४०७ मॉडेल टेम्पोचा ड्रायव्हर रामनिवास बिष्णोई व डिलिव्हरी बॉय ओमप्रकाश बिष्णोई यांनी संगनमताने व्यवसायिक गॅस सिलेंडरमध्ये घरगुती गॅस सिलेंडरमधील गॅस भरुन ते टेम्पोमध्ये भरुन त्या गॅस सिलेंडर्समधील गॅस १० इंच लांबीच्या लोखंडी नळी (बासरी) चे सहाय्याने व्यवसायिक वापराच्या रिकामी गॅस सिलेंडरमध्ये अर्धवट भरुन त्याला त्यांच्याकडे झाडझडतीत मिळालेले भारत पेट्रोलियम कंपनीचे लोगो मार्क असलेले पिवळ्या रंगाचे प्लॅस्टिकचे सिल लावून ते अवैधमार्गाने हॉटेल व्यवसायिकांना तसेच फेरीवाल्यांना विक्री करीत असल्याचे आढळून आले. गॅस सिलेंडर्सचा काळाबाजार करुन शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक करीत असल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द डोंगरी पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.नों.क्र. ०१/२०१३ दिनांक ०५/०१/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन महिंन्द्रा जीआयओ मेकचा लाल रंगाचा टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१०, व्यवसायिक वापराचे १९ कि.ग्रॅ. च्या भरलेले तसेच रिकामी व इतर असा एकूण २,७६,०५५/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त गुन्हा नोंद प्रकरणी फिरत्या पथकाने धाड टाकून कैलास बाळकृष्ण खराडे नामे इसमास त्याच्या ताब्यातील टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० या टेम्पोमध्ये लोंखडी नळीच्या सहाय्याने भरलेल्या व्यवसायीक गॅस सिलेंडरमधील गॅसचा साठा हा दुसऱ्या रिकाम्या व्यवसायीक गॅस सिलेंडरमध्ये अत्यंत धोकादायकरित्या भरीत असताना रंगेहात पकडले आहे. सदरचे भरलेले व्यवसायीक सिलेंडरचा साठा हा कोठून प्राप्त केला. तसेच तो नोंदणीकृत ग्राहक आहे किंवा कसे ? याबाबत पथकाने विचारणा केली असता, कैलास बाळकृष्ण खराडे याने तो नोंदणकृत ग्राहक नसल्याचे सांगून सदर व्यवसायीक गॅस सिलेंडरचा साठा हा मे. मधु गॅस सर्व्हिस या गॅस

वितरकाकडून रितसर बाजारभावाप्रमाणे रक्कम अदा करुन खरेदी केल्याचे सांगितले. सदरचा अनधिकृत सिलेंडरचा साठा प्राप्त करण्यासाठी मे. मधु गॅस सर्व्हिसच्या अधिपत्त्याखालील काम करणारे चालक रामनिवास बिष्णोई तसेच डिलेव्हरी बॉय ओमप्रकाश बिष्णोई हे दोन्ही इसम त्यास सदर अवैध व्यवसायासाठी सहकार्य करीत असल्याचे सांगितले. तसेच पूर्ण भरलेले व्यवसायीक सिलेंडरमधून रिकाम्या सिलेंडरमध्ये गॅसचा साठा अर्धवट भरुन सदरचे अर्धवट भरलेले व्यवसायीक गॅस सिलेंडर तो हॉटेलवाले व फेरीवाले यांना अवैध विक्री करीत असल्याचे पंचांसमक्ष कबूल केले आहे.

मे. मधु गॅस सर्व्हिसचे मालक हे मे. बी.पी.सी.एल. या सरकारी तेल कंपनी बरोबर करारबध्द आहे. सदर करारनाम्यानुसार त्यांच्या गॅस एजन्सीमध्ये कंपनीच्या वतीने प्राधिकृत केलेले अथवा कंपनीकडे घरगुती तसेच व्यवसायीक वापरासाठी नोंदणीकृत असलेल्या ग्राहकांना भरलेल्या गॅस सिलेंडरचा पुरवठा करण्यास त्यांना अनुमती आहे. सदर प्रकरणी, मे. बी.पी.सी.एल. या तेल कंपनीस त्यांच्या धोरणाबाबत विचारणा केली असता, त्यांनी सादर केलेल्या अहवालात, "मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. ही कंपनी घरगुती आणि व्यवसायीक सिलेंडर वितरकास पुरवठा करते. सामान्य परिस्थितीत नियमानुसार व्यवसायीक सिलेंडर्सचे वितरण वितरकामार्फत प्राधिकृत ग्राहकास करण्यात येते ", असे नमूद आहे. म्हणजेच कोणत्याही गॅस वितरकास त्यांच्याकडे नोंदणीकृत नसलेल्या ग्राहकास गॅस सिलेंडरचा पुरवठा करण्यास मनाई आहे. परंतू मे. मधु गॅस सर्व्हिसचे मालक यांनी कैलास बाळकृष्ण खराडे हा त्यांच्याकडे नोंदणीकृत ग्राहक नसल्याचे माहित असून सुध्दा त्यांनी केवळ व्यवसायीक दृष्ट्या नफेखोरीचा उद्देश बाळगून सदर आरोपीतास नियमितपणे गॅस सिलेंडरचा पुरवठा केल्याचे दिसून येते. वास्तविक पाहता मे. मधु गॅस सर्व्हिसचे मालक सलिम दोसानी यांनी त्यांच्या ताब्यातील अतिज्वलनशिल गॅस सिलेंडरचा पुरवठा अनधिकृतपणे करीत असतांना त्यांनी यापासून निर्माण होणाऱ्या वाईट परिणामाची तमा न बाळगता त्यांनी केवळ नफेखोरीच्या उद्देशाने गॅस सिलेंडरचा अनधिकृत पुरवठा करुन त्यांनी अधिकृत वितरण म्हणून मे. बी.पी.सी.एल. या तेल कंपनीचे तसेच पर्यायाने शासनाची घोर फसवणूक करुन विश्वासार्हता गमावल्याचे दिसून येते. त्यामुळे मे. मधु गॅस सर्व्हिसचे मालक सलिम दोसानी यांनी कैलास बाळकृष्ण खराडे या अनधिकृत इसमास अथवा नोंदणीकृत नसलेल्या ग्राहकास सिलेंडरचा पुरवठा केल्याने सदर गुन्हा नोंद प्रकरणी त्यांचाही नमूद गुन्ह्यात सहभाग असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याने मे. मधु गॅस सर्व्हिसचे मालक सलिम दोसानी यांनी सर्व संबंधितांशी संगणमत करुन दि लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (रेग्युलेशन ऑफ सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्यूशन) ऑर्डर २००० तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चा भंग केल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, घटनास्थळी जप्त करण्यात आलेला संपूर्ण व्यवसायीक वापराच्या सिलेंडर्सचा अवैध साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तथापी, राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक २३/०५/२०१२ रोजीच्या पत्रान्वये " The seized LPG cylinder is a property of the Oil companies and therefore the premise of

DIRECTOR ... OFFICE ... IBAI

depositing money against the seized cylinder is not possible " असे नमूद असल्याने विविध धाडींमध्ये जप्त करण्यात आलेल्या विविध तेल कंपन्यांचा गॅस सिलेंडरचा साठा हा संबंधित तेल कंपन्यांची मालमत्ता आहे. सबब, उपरोक्त शासनजमा केलेल्या गॅस सिलेंडरच्या साठ्याची आकारण्यात आलेली रक्कम वसूल करणे शक्य नसल्याने सदरचा जप्त गॅस सिलेंडरचा संपूर्ण साठा हा राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांचे मदतीने संबंधित तेल कंपनीं यांना बंधपत्र घेऊन देण्यात यावा.

प्रस्तूत प्रकरणी, टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० चा मालक मानसिंग श्रीरंग भानसे यांनी सुनावणींच्यावेळी केलल्या खुलाशात, त्याच्या नावे असलेली गाडी क्र. एमएच-०२-वायए-७५१० दिनांक १९/०५/२०१२ रोजी श्री. कैलास बाकु खराडे या व्यक्तीस विकली आहे. तसेच दिनांक ०४/०१/२०१३ रोजी काही गैर वर्तन केले असे त्याला दिनांक २८/०१/२०१३ रोजी नोटीस मार्फत कळविले असता त्याने पोलिस स्टेशन दिनांक २९/०१/२०१३ रोजी जबानी दिली आहे. तसेच श्री. कैलास बाकु खराडे यास त्याने गाडी विकत्या वेळी करारपत्र लिहिले आहे की, गाडीचा तो मालक नाही व गाडीवर असलेली कोणतीही केस अथवा गुन्हा व कोणतेही तक्रार याला श्री. कैलास बाळु खराडे जबाबदार असतील असे त्याने मान्य केले आहे. तसेच तो करारपत्र सोबत देत असून त्याचा या गाडीशी काही संबंध नसून त्याला यातून मुक्त करावे, असे सांगितले.

तथापी, सदर गुन्हा नोंद प्रकरणी कैलास बाळकृष्ण खराडे यास नमूद टेम्पोमध्ये अवैधरित्या एका गॅस सिलेंडरमधून दुसऱ्या गॅस सिलेंडरमध्ये गॅसचा साठा भरत असताना पथकाने त्याच्यावर कायदेशिर कारवाई केली आहे. तसेच टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० या टेम्पोचा सदर गैरकृत्यासाठी तसेच अवैध वाहतुकीसाठी नमूद टेम्पोचा वापर केल्याचे निष्पन्न होत आहे. प्रस्तुत प्रकरणी टेम्पो मालकाने त्याच्या नावे परिवहन विभागात नोंदणीकृत असलेला टेम्पो त्याने कैलास बाळकृष्ण खराडे यास विकल्यानंतर प्रचलित पध्दतीनुसार परिवहन विभागाकडून रितसर त्याच्या नावे हस्तांतरण करणे बंधनकारक आहे. परंतू टेम्पो मालकाने तसे न करता परस्पर त्याच्या स्तरावर केवळ करारपत्र देऊन त्याच्या नावे असलेला टेम्पोचे अवैध हस्तांतरीत केल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी, टेम्पो मालक मानसिंग श्रीरंग भानसे यांच्या अपरोक्ष जरी कैलास बाळकृष्ण खराडे यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर केला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० याची बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास वाहनाचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहन त्याच्या मालकास परत करण्याचा अथवा वाहनाचा मालक तेवढी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरचे वाहन जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.



CONTROLLER OF RATIONING ... HE

प्रस्तुत गुन्हयात जप्त करण्यात आलेले १ नग वजन काटा, १ नग स्प्रिंग गार्डन लेमन एअर फ्रेशनर या वस्तू पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

तसेच नमुद गुन्हयातील जप्त करण्यात आलेले सुमारे १० इंचाची १ नग लोखंडी नळी (बासरी), गॅस सिलेंडर्सच्या नॉबला लावायची प्लॅस्टिकची सफेद रंगाची ६६ बुचे, भारत पेट्रोलियम असे लोगो असलेले पिवळ्या रंगाचे १५ सिल या वस्तु सिलेंडर्स सिल करण्यासाठी तसेच गॅस भरण्यासाठी लागणारे साहित्य म्हणुन सदरच्या अवैध व्यवसायासाठी वापरण्यात आलेल्या असल्याने सदर मुद्देमाल हा किरकोळीने विक्री केल्यास त्याचा पुन्हा गैरवापर होण्याची साशंकता आहे. सबब, सदरचा मुद्देमाल हा कायमस्वरुपी जप्त करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६- अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये डोंगरी पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.नों.क्र. ०१/२०१३ दिनांक ०५/०१/२०१३ अन्वये गुन्हा नोंद मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) जप्त करण्यात आलेले व्यवसायिक वापराचे १९ कि.ग्रॅ. वजनाचे भरलेले १४ गॅस सिलेंडर्स, २ रिकामी गॅस सिलेंडर्स व अर्धवट भरलेला १ गॅस सिलेंडर्सचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) उपरोक्त शासनजमा करण्यात आलेल्या व्यावसायीक वापराच्या गॅस सिलेंडर्सचा संपुर्ण साठा हा पोलिसांनी, राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०, पी डिमेलो रोड, वाडीबंदर, मुंबई यांचे मदतीने संबंधित तेल कंपनी यांना बंधपत्र घेऊन देण्यात यावा.

३) जप्त करण्यात आलेल टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० हे वाहन शासनजमा करण्यात येत आहे. सदर वाहनाची बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास वाहनाचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहन त्याच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनाच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

४) अथवा वाहनाचा मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनाची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरची वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

५) जप्त करण्यात आलेले १ नग वजन काटा, १ नग स्प्रिंग गार्डन लेमन एअर फ्रेशनर या वस्तू याची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

६) उर्वरीत जप्त करण्यात आलेल्या सुमारे १० इंचाची १ नग लोखंडी नळी (बासरी), गॅस सिलेंडर्सच्या नॉबला लावायची प्लॅस्टिकची सफेद रंगाची ६६ बुचे, भारत पेट्रोलियम असे लोगो असलेले पिवळ्या रंगाचे १५ सिल या वस्तु कायमस्वरुपी जप्त करुन शासनजमा करण्यात यावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० चा चालक कैलास बाळकृष्ण खराडे
२) टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-७५१० चा मालक
३) मे. मधू गॅस सर्व्हिस एजन्सीचे मालक सलिम दोसानी
४) मे. मधू गॅस सर्व्हिसच्या मालकीचे ४०७ मॉडेलच्या टेम्पोचा ड्रायव्हर रामनिवास बिष्णोई
५) मे. मधू गॅस सर्व्हिसमधील डिलिव्हरी बॉय ओमप्रकाश बिष्णोई
(वरिष्ठ पोलिस निरिक्षक, डोंगरी पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, डोंगरी पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १० पी डिमेलो रोड, वाडी बंदर, मुंबई-४०० ०१० (दुरध्वनी क्र. ०२२-३७५८१३०) यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
३) विभागीय व्यवस्थापक, मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
~~६)~~ निवड नस्ती.

CONTROLLER OF R.A. & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
- 496 -
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.